**रे.के.नं. १०७/२०२१**

**नि.क्र. ३८/क**

अभियोगपक्षातर्फे **साक्षीदार क्र.४**याची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | **तुकाराम रावसाहेब निंबाळकर** |
| वय | - | ४२ वर्षे |
| व्यवसाय | - | पोलिस उपअधिक्षक |
| राहणार | - | गुन्हे अन्वेषण विभाग अमरावती |

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. शितल पवार यांच्यामार्फत...**

१. दिनांक ३१.१०.२०२० रोजी मी उरण पोलिस ठाण्यात सहायक पोलिस निरीक्षक पदावर कार्यरत होतो. सदरचा गुन्हाची नोंद ही पि.एस.आय चव्हाण यांनी केली होती. त्यांची बदली झाल्यानंतर सदर गुन्हयांचा तपास माझ्याकडे सोपवण्यात आला. तपासकामी मला प्रथम खबर तसेच फिर्यादी यांने फिर्यादसोबत दिलेली कागदपत्रे मिळाली होती. त्या कागदपत्रात गुन्हा दाखल करण्यासंबंधी कार्यालयीन आदेश, आरोपीस दिलेली नोटीस, गुन्हयांचे घटनास्थळाचे स्थळपाहणी अहवाल, घटनास्थळाचे फोटो इत्यादी कागदपत्रे होती. मी तपासाअंतर्गत शासकीय अधिका-यांचे तपास टिपण नोंदवले. त्यानंतर मी आरोपीस नोटीस देउन दोषारोप पत्र दाखल केले. माझे तपासात आरोपींनी नियमाचे उल्लंघन करून बांधकाम केल्याचे निष्पन्न झाले होते. मी आरोपींना पाहिल्यास ओळखू शकतो. तो आज रोजी न्यायालयात हजर आहे.

## साक्षीदाराचा उलटतपास आरोपीचे वकिल श्री. योगेश गांगण यांच्यामार्फत

२. हे म्हणणे खरे आहे की, मी उरण येथे कार्यरत असताना एका गुन्ह्यात अलिम शेख नावाचा व्यक्ती आरोपी होता. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीने सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करूनच मी दोषारोप पत्रासोबत ती कागदपत्रे सामील केली. हे मला सांगता येत नाही की, निशाणी क्रमांक २६ वरील नोटीस अलिम शेख याने स्विकारली. मी आरोपीस अटक केली नाही. आरोपीला नोटीस दिली त्यावेळी मी आरोपीची सही घेतली होती. हे मला माहिती नाही की, एमआरटीपी कायद्याचे कलम ५५(१) चे नोटीस आरोपीस द्यावी लागते. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्रमांक २६ वर अलिम शेख याची सही असल्याचे माझ्या लक्षात आले. मी अलिम शेख याचे तपास टिपण नोंदवले नाही. मी मौजे दिघोडे येथील भूमापन क्रमांक ३७/१ अ चा सातबाराचा उतारा पाहिला नाही. त्या भूमापन क्रमांक दिनांक २४.०१.२०१९ च्या अगोदर काय स्थिती होती याचा तपास मी केला नाही.हे म्हणणे खरे नाही की, या प्रकरणात दोषारोप पत्र दाखल करण्यापुर्वी शासनाची मंजूरी घेणे आवश्यक आहे. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २२.०८.२०१९ रोजीच्या निशाणी क्रमांक २५ कडील आदेशाचे अवलोकन मी केले होते. तो आदेश फिर्यादीने फिर्यादसोबत दिलेला होता. त्यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी कोण होते ते मला सांगता येत नाही. सदर निशाणी क्रमांक २५ वरील आदेशावर कोणाची सही आहे याबाबत तपास मी केलेला नाही. मी कार्यालयात अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालयात जाउन त्या आदेशाची खात्री करून घेतली नाही. हे म्हणणे खरे आहे की, तो आदेश कोणत्या गुन्ह्यासंबंधी काढलेला आहे याचा स्पष्ट उल्लेख त्यात नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदारांचे खोटे जबाब नोंदवले. साक्षीदार शिवराज चौहान हा शासकीय अधिकारी आहे त्यामुळे तो ब-याच गुन्ह्यात साक्षीदार असू शकतो. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदारांचे खोटे जबाब

नोंद करून खोटे दोषारोप पत्र दाखल केले व आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकूर खोटा सांगितला आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

सही/-

उरण, **(एस. पी. वानखडे)**
दिनांक – ०६.०१.२०२६ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उरण